**विषय :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १४० अ अन्वये मालमत्ता कराच्या सामान्य करात सूट देणे बाबत**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १४० अ अन्वये मालमत्ता कर देण्याकरीता मुख्यतः पात्र असणारी कोणतीही व्यक्ती, असा कर त्या प्रयोजनाकरीता बिलात विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापूर्वी भरत असेल किंवा असा कर, संपूर्ण वर्षाकरिता आगाऊ भरत असेल तर तिला महानगरपालिका, सर्वसाधारण आदेशाद्ववारे निर्धारीत करील अशा दराने मालमत्ता कर भरण्यातून सूट देण्यात येईल आणि मालमत्तेच्या वापरकर्त्याच्या वेगवेगळया वर्गाकरीता अशी सूट देण्याचे वेगवेगळे दर विनिर्दिष्ट करता येईल अशी अधिनियमामध्ये तरतुद आहे.

तरी, खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे भिवंडी महानगरपलिकेच्या कार्यक्षेत्रातील मालमत्ता धारकांकडून मालमत्ता कराची रक्कम वेळेत जमा केल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १४० अ अन्वये सामान्य करात खालील प्रमाणे सुट देता येईल.

| अ.क्र. | रिबेट (सूट) तक्ता :- खालील कालावधीत संपूर्ण थकबाकीसह दुसऱ्या सहामाहीचे बिल भरल्यास दर्शविलेल्या दराने सूट मिळेल | |
|---|---|---|
| | **कालावधी** | **सूटचा दर (दुसऱ्या सहामाहीच्या सामान्य करावर )** |
| १ | दि. १५ जुन पर्यंत भरल्यास | ५% |
| २ | दि. १६ जून ते ३० जून | ४% |
| ३ | दि १ जुलै ३१ जुलै पर्यंत | ३% |
| ४ | दि. १ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट | २% |

उपरोक्त प्रस्तावास मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळावी ही विनंती.

**प्रशासकीय ठराव क्र.** ९८३          **दि.** ६/ ६ /२०२३

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील मालमत्ताधारकांकडून वार्षिक मालमत्ता कराची संपूर्ण थकबाकीसह दुसऱ्या सहामाहीचे बिल भरल्यास किंवा महानगरपालिकेने दिलेल्या मुदतीचे आत जमा केल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १४० अ अन्वये मालमत्ता करात सूट देणे बाबतचा वरील प्रस्ताव सादर केला आहे.

सद्या शासनाचे दिनांक १० जून २०२२ च्या आदेशान्वये मा. आयुक्त यांना प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेले असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५२ अ (१अ) व १(ब) च्या तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ , प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण ७ कलम ७३ नुसार वरील नमूद प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**